लक्ष महाराष्ट्र

# सीएमसीएस महाविद्यालयातील सायबर वॉरियर्सचे अनोखे कलात्मक सादरीकरण

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

युवकांमधील सोशल मिडियाचे वाढते प्रमाण, फोटो मॉर्फिंगचा चुकीचा वापर, ओटीपीद्वारे होणारी फसवणूक, बँक-फायनान्स घोटाळे व ठकबाजी या प्रकारांपासून नागरिकांना सावध करण्यासाठी मविप्र सीएमसीएस महाविद्यालयाच्या २० सायबर वॉरियर्सनी आषाढी एकादशीवर आधारित 'सायबरवारी' हा उपक्रम राबविला. गोदाघाटासह नाशिकच्या धार्मिक परिसरात विठ्ठल-रुख्मिणी आणि वारकरी बांधवांची वेशभूषा करून सुमारे १ हजार नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांना जागरूक करत सायबर सुरक्षेचा संदेश देण्यात आला.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत मविप्रच्या सीएमसीएस महाविद्यालयातील सायबर वॉरियर्सनी अनोख्या पद्धतीने कलात्मक सादरीकरण केले. प्राचार्य डॉ. मधुकर शेलार, प्रकल्प समन्वयक प्रा. स्वाती तपकीरे, क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, संचालक अजय शिर्के, समन्वयक गायत्री केसकर व दिपू यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.